PDF Seva All PDF Collection

# ॥ श्री गुरुचरित्र - अध्याय चौदहवाँ ॥

## ॥ मंगलाचरण ॥

॥ श्री गणेशाय नमः ॥ श्री सरस्वत्यै नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥

## ॥ सिद्ध-नामधारक संवाद ॥

नामधारक शिष्य देखा । विनवी सिद्धासी कवतुका ।

प्रश्न करी अतिविशेखा । एकचित्ते परियेसा ॥१॥

जय जयाजी योगीश्वरा । सिद्धमूर्ति ज्ञानसागरा ।

पुढील चरित्र विस्तारा । ज्ञान होय आम्हांसी ॥२॥

उदरव्यथेच्या ब्राह्मणासी । प्रसन्न जाहले कृपेसी ।

पुढे कथा वर्तली कैसी । विस्तारावे आम्हांप्रति ॥३॥

ऐकोनि शिष्याचे वचन । संतोष करी सिद्ध आपण ।

श्रीगुरुचरित्र कामधेनु जाण । सांगता जाहला विस्तारे ॥४॥

## ॥ सायंदेव ब्राह्मण की भक्ति ॥

ऐक शिष्या शिखामणि । भिक्षा केली ज्याचे भुवनी ।

तयावरी संतोषोनि । प्रसन्न जाहले परियेसा ॥५॥

गुरुभक्तीचा प्रकारु । पूर्ण जाणे तो द्विजवरू ।

पूजा केली विचित्रु । म्हणोनि आनंद परियेसा ॥६॥

तया सायंदेव द्विजासी । श्रीगुरू बोलती संतोषी ।

भक्त होय रे वंशोवंशी । माझी प्रीति तुजवरी ॥७॥

Visit Website : https://www.PDFSeva.Net

## ॥ श्रीगुरु स्तुति ॥

ऐकोनि श्रीगुरुंचे वचन । सायंदेव विप्र करी नमन ।

माथा ठेवूनि चरणी । न्यासिता झाला पुनःपुन्हा ॥८॥

जय जया जगद्‌गुरु । त्रयमूर्तींचा अवतारू ।

अविद्यामाया दिससी नरु । वेदां अगोचर तुझी महिमा ॥९॥

विश्वव्यापक तूंचि होसी । ब्रह्मा-विष्णु-व्योमकेशी ।

धरिला वेष तूं मानुषी । भक्तजन तारावया ॥१०॥

## ॥ सायंदेव की प्रार्थना और संकट ॥

तुझी महिमा वर्णावयासी । शक्ति कैंची आम्हांसी ।

मागेन एक आता तुम्हांसी । तें कृपा करणे गुरुमूर्ति ॥११॥

माझे वंशपारंपरी । भक्ति द्यावी निर्धारी ।

इह सौख्य पुत्रपौत्री । उपरी द्यावी सद्‌गती ॥१२॥

ऐसी विनंति करुनी । पुनरपि विनवी करुणावचनी ।

सेवा करितो द्वारयवनी । महाशूरक्रुर असे ॥१३॥

प्रतिसंवत्सरी ब्राह्मणासी । घात करितो जीवेसी ।

याचि कारणे आम्हांसी । बोलावीतसे मज आजि ॥१४॥

जातां तया जवळी आपण । निश्चये घेईल माझा प्राण ।

भेटी जाहली तुमचे चरण । मरण कैचे आपणासी ॥१५॥

## ॥ श्रीगुरु का अभयदान ॥

संतोषोनि श्रीगुरूमूर्ति । अभयंकर आपुले हाती ।

विप्रमस्तकी ठेविती । चिंता न करी म्हणोनिया ॥१६॥

भय सांडूनि तुवां जावे । क्रुर यवना भेटावे ।

Visit Website : https://www.PDFSeva.Net

संतोषोनि प्रियभावे । पुनरपि पाठवील आम्हांपाशी ॥१७॥

जंववरी तू परतोनि येसी । असो आम्ही भरंवसी ।

तुवां आलिया संतोषी । जाऊ आम्हीं येथोनि ॥१८॥

निजभक्त आमुचा तू होसी । पारंपर-वंशोवंशी ।

अखिलाभीष्ट तू पावसी । वाढेल संतति तुझी बहुत ॥१९॥

तुझे वंशपारंपरी । सुखे नांदती पुत्रपौत्री ।

अखंड लक्ष्मी तयां घरी । निरोगी होती शतायुषी ॥२०॥

## ॥ यवन का हृदय परिवर्तन ॥

ऐसा वर लाधोन । निघे सायंदेव ब्राह्मण ।

जेथे होता तो यवन । गेला त्वरित तयाजवळी ॥२१॥

कालांतक यम जैसा । यवन दुष्ट परियेसा ।

ब्राह्मणाते पाहतां कैसा । ज्वालारूप होता जाहला ॥२२॥

विमुख होऊनि गृहांत । गेला यवन कोपत ।

विप्र जाहला भयचकित । मनीं श्रीगुरूसी ध्यातसे ॥२३॥

कोप आलिया ओळंबयासी । केवी स्पर्शे अग्नीसी ।

श्रीगुरूकृपा होय ज्यासी । काय करील क्रुर दुष्ट ॥२४॥

... (मध्य की ओव्या गुरु-कृपा का वर्णन करती हैं) ...

हृदयज्वाळा होय त्यासी । जागृत होवोनि परियेसी ।

प्राणांतक व्यथेसी । कष्टतसे तये वेळी ॥३०॥

स्मरण असे नसे कांही । म्हणे शस्त्रे मारितो घाई ।

छेदन करितो अवेव पाही । विप्र एक आपणासी ॥३१॥

स्मरण जाहले तये वेळी । धांवत गेला ब्राह्मणाजवळी ।

Visit Website : https://www.PDFSeva.Net

लोळतसे चरणकमळी । म्हणे स्वामी तूंचि माझा ॥३२॥

॥ श्रीगुरु का प्रयाण और आश्वासन ॥

संतोषोनि द्विजवर । आला ग्रामा वेगवक्त्र ।

गंगातीरी असे वासर । श्रीगुरुंचे चरणदर्शना ॥३४॥

देखोनिया श्रीगुरूसी । नमन करी तो भावेसी ।

स्तोत्र करी बहुवसी । सांगे वृत्तांत आद्यंत ॥३५॥

संतोषोनि श्रीगुरूमूर्ति । तया द्विजा आश्वासिती ।

दक्षिण देशा जाऊ म्हणती । स्थान-स्थान तीर्थयात्रे ॥३६॥

न करा चिंता असाल सुखे । सकळ अरिष्टे गेली दुःखे ।

कहूनि हस्त ठेविती मस्तके । भाक देती तये वेळी ॥४४॥

---

॥ फलश्रुति एवं समाप्ति ॥

ऐसेपरी संतोषोनि । श्रीगुरू निघाले तेथोनि ।

जेथे असे आरोग्यभवानी । वैजनाथ महाक्षेत्र ॥४५॥

गंगाधराचा नंदनु । सांगे गुरुचरित्र कामधेनु ।

सिद्धमुनि विस्तारून । सांगे नामकरणीस ॥४८॥

॥ इति श्रीगुरूचरित्रामृते परमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्ध-नामधारकसंवादे क्रुरयवनशासनं-सायंदेववरप्रदानं नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ ॥ श्रीगुरूदत्तात्रेयार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥ ॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥

***************

Visit Website : https://www.PDFSeva.Net